आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२६ सप्टेंबर २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- केंद्र सरकार राज्यातल्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचं प्रधानमंत्र्यांचं मुख्यमंत्र्यांना आश्वासन

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ८ आणि ९ ऑक्टोबरला राज्याच्या दौऱ्यावर

- पीएम-किसान योजनेचा २१ वा हप्ता लाभार्थ्यांच्या खात्यात जमा

- लडाखमध्ये झालेल्या हिंसाचाराप्रकरणी सामजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत अटक

आणि

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि श्रीलंका यांच्यात सुपर फोर फेरीतला अखेरचा सामना, नाणेफेक जिंकून श्रीलंकेचा प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय

**<><><><>**

महाराष्ट्रातल्या आपद्ग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहू, असं आश्वासन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची आज नवी दिल्ली इथं भेट घेतली. राज्यातल्या अतिवृष्टी, पूरस्थिती आणि त्यातून शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची माहिती त्यांनी यावेळी प्रधानमंत्र्यांना दिली, त्यावेळी प्रधानमंत्र्यांनी हे आश्वासन दिल्याचं फडणवीस यांनी माध्यमांना सागितलं.

**- - - होल्ड - -**

गडचिरोली इथं पोलाद सिटीत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येत असून, हा एक आकांक्षित जिल्हा आहे. महाराष्ट्र राज्य मायनिंग कॉर्पोरेशनला एरिया लिमिटमध्ये सवलत मिळावी, अशी विनंती मुख्यमंत्र्यांनी मोदी यांच्याकडे केली आहे.

राज्यात 10 शस्त्रास्त्र निर्मिती कारखाने आहेत. भारताला लागणाऱ्या एकूण शस्त्र आणि दारुगोळ्यापैकी 30 टक्के उत्पादन महाराष्ट्रात होतं. पुणे- अहिल्यानगर- छत्रपती संभाजीनगर, अमरावती- वर्धा- नागपूर- सावनेर, आणि नाशिक - धुळे या तिन्ही कॉरिडॉरच्या माध्यमातून मोठी गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती होईल, असा विश्वास

मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. नवीमुंबई विमानतळाला दि बा पाटील यांचं नाव देण्याचा प्रस्तावाची माहिती त्यांनी प्रधानमंत्र्यांना दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या 8 आणि 9 ऑक्टोबर रोजी फिनटेक परिषदेसाठी मुंबईत येणार असून, नवी मुंबई विमानतळ आणि मेट्रो-3 या प्रकल्पांचा प्रारंभ करतील.

**<><><><>**

केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज दूरस्थ पद्धतीनं प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, पीएम-किसान योजनेचा २१ वा हप्ता लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केला. २ लाख ७० हजार महिला शेतकऱ्यांसह २७ लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात एकूण ५४० कोटींहून अधिक रुपये हस्तांतरित करण्यात आले आहेत, अशी माहिती केंद्रीय कृषी मंत्र्यांनी दिली. पूर आणि भूस्खलनाचा मोठा फटका बसलेल्या हिमाचल प्रदेश, पंजाब आणि उत्तराखंडमधील शेतकऱ्यांना हा हप्ता प्राधान्याने देण्यात आला आहे. फेब्रुवारी २०१९ मध्ये ही योजना सुरू झाल्यापासून या तिन्ही राज्यांना १३ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी वितरित केला आहे, असं कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने सांगितलं.

दरम्यान, केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज नवी दिल्ली इथं रशियाचे उपपंतप्रधान दिमित्री पात्रुशेव याची भेट घेत कृषी आणि अन्न सुरक्षा क्षेत्रात परस्पर सहकार्यावर चर्चा केली.

**<><><><>**

सेवा आणि सुशासन या मंत्राच्या आधारे वाटचाल करत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार परिवर्तन आणि प्रगती घडवून आणण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. सेवा पर्वच्या या विशेष मालिकेअंतर्गत आज अंतराळ क्षेत्राला अभूतपूर्व उंचीवर नेण्यासाठी केलेले प्रयत्न आज जाणून घेऊया...

**- - व्हीसी - -**

*(प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने अंतराळ क्षेत्रात एकामागून एक टप्पे गाठले आहेत. हाफ-क्रायोजेनिक इंजिन आणि इलेक्ट्रिक प्रोपल्शनमुळे अंतराळ तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती झाली आहे. भारताने काही काळापूर्वी अंतराळात डॉकिंग अर्थात उपग्रह जोडणी आणि अनडॉकिंग म्हणजेच उपग्रहांचं विलगीकरण यशस्वीरित्या पूर्ण केलं. ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांचा अंतराळातला यशस्वी प्रवास हे भारताच्या पहिल्या मानवसहित*

*अंतराळ मोहिमेच्या दिशेने टाकलेलं पहिलं पाऊल आहे. २०३५पर्यंत अंतराळस्थानक उभारण्याचीही योजना आहे. पायाभूत सुविधा नियोजनात उपग्रह-आधारित कृषी क्षेत्राला साहाय्य करणं, मच्छिमारांची सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन अशा क्षेत्रात भारताने प्रगतीचे नवे टप्पे गाठले आहेत.)*

**<><><><>**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाची येत्या रविवारी होणारी नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा पुढं ढकलण्यात आली असून ती आता येत्या ९ नोव्हेंबरला होईल. राज्यातल्या अनेक भागात अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे अनेक गावांचा संपर्क तुटला असून येत्या दोन दिवसात पुन्हा अतिवृष्टीचा इशारा हवामान विभागाने दिला असल्यामुळे, ही परीक्षा पुढं ढकलण्याची मागणी शासनाकडे होत होती. त्यानुसार राज्यसरकारने आयोगाला विनंती केल्यामुळे हा बदल झाला आहे.

९ नोव्हेंबरला गट - ब अराजपत्रित सेवा संयुक्त परीक्षा नियोजित होती. ती या बदलामुळे पुढं ढकलली असून त्याची सुधारित तारीख नंतर जाहीर करु, असं लोकसेवा आयोगाच्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><>**

केंद्र सरकारनं अलिकडेच वस्तू आणि सेवा करात केलेल्या सुधारणा म्हणजे भारताच्या अप्रत्यक्ष कर व्यवस्थेच्या सुलभीकरणाच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल ठरल्या आहेत. आजच्या भागात ऐकूया सर्वसामान्यांना उपयुक्त ठरणाऱ्या विविध साहित्यावरच्या जीएसटी करांविषयी...

**- - व्हीसी - -**

*(केंद्र सरकारने विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणाऱ्या विविध स्टेशनरी साहित्यावरचा जीएसटी कमी केल्याने आता सामान्यांवरचा शैक्षणिक खर्च कमी व्हायला मदत होणार आहे. या सुधारणांतर्गत वह्या, आलेख वही, गिरमिट, पेन्सिल अशा विविध वस्तू पूर्णपणे करमुक्त केल्या आहेत. त्यामुळे हे साहित्य अधिक परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध होणार आहेत. तसंच, अडीच हजार रुपयांपेक्षा कमी विक्री मूल्य असलेल्या पादत्राणांवरच्या जीएसटीतही कपात करण्यात आली आहे. यासोबत लाकूड, दगड, धातूंपासून बनवलेल्या वस्तूंवरही करांचा दर ५ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे.)*

<><><><>

आगामी काळात तंत्रज्ञान सार्वभौमत्वावरूनच भू-राजकीय सार्वभौमत्वाची निश्चिती होणार असल्याचं केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या ८४ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. गेल्या अकरा वर्षांत भारत तंत्रज्ञानाधारित देश बदल राष्ट्र बनला असल्याचंही ते म्हणाले.

<><><><>

लडाखमध्ये झालेल्या हिंसाचाराप्रकरणी सामजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत अटक केली गेली आहे. लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा दिला जावा या मागणीसाठी वांगचूक हे उपोषणाला बसले होते. त्यांनी आंदोलनकर्त्यांना चिथावणी दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणात आतापर्यंत ५० पेक्षा जास्त जणांना ताब्यात घेतलं आहे.

दरम्यान सुरक्षेची उपाययोजना म्हणून वांगचूक यांच्या अटकेनंतर लेहमधली मोबाइल इंटरनेट सेवा बंद केली आहे, तर ब्रॉडबँड इंटरनेटचा वेगही कमी केला आहे. कारगिलसह इतर शहरांमध्येही जमावबंदी लागू केली आहे.

<><><><>

देशभरातल्या सर्व शिक्षण मंडळांचा इयत्ता दहावी आणि बारावीचा अभ्यासक्रम समान पातळीवरचा असावा, याची सुनिश्चिती करण्याची जबाबदारी केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद अर्थात NCERT वर सोपवली आहे. यासंदर्भातली अधिसूचना मंत्रालयानं आज जारी केली. उच्च शिक्षण संस्थांमधला विद्यार्थ्यांच्या प्रवेशासोबतच, केंद्र आणि राज्य सरकारे तसंच केंद्रशासित प्रदेशांमधील रोजगारासाठी समतुल्यता असावी यासाठी असा प्रयत्न केला जात असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत स्थापन केलेल्या राष्ट्रीय मूल्यांकन केंद्राच्या माध्यमातू राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद ही जबाबदारी पार पाडेल.

<><><><>

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज सुपर फोर फेरीतला अखेरचा सामना भारत आणि श्रीलंका यांच्यात सुरू आहे. या सामन्यात श्रीलंकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या दोन षटकात बिनबाद १५ धावा झाल्या होत्या.

दरम्यान भारत आणि पाकिस्ताननं स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला असून, विजेतेपदासाठीची अंतिम लढत येत्या रविवारी होणार आहे.

**//<><><><>//**